# मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प

## समन्वय व व्यवस्थापन कक्ष

शेती महामंडळ बिल्डींग, २७० भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, सिंबॉयसीस कॉलेज जवळ, पुणे-४११०१६

फोन नं.०२०-२५६५६५७७ / ७८, ई-मेल-pcmu.smart@gmail.com, वेबसाईट-www.smart-mh.org


जा.क्र.स्मार्ट/पीसीएमयु/प्रशासन/मनुष्यबळ पुरवठा/ १४३४ /२०२२ दि.२९/०९/२०२२

प्रति,

१) प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (सर्व)
२) प्रमुख, विभागीय अंमलबजावणी कक्ष (सर्व)
३) प्रमुख, जिल्हा अंमलबजावणी कक्ष (सर्व)

**विषय:- स्मार्ट प्रकल्पांकरिता त्रयस्थ मनुष्यबळ संस्थेच्या नियुक्तीबाबत.**

संदर्भ :- कृषि विभाग शासन निर्णय क्र.कृव्यप्र ५४१९/प्र.क्र१२९/८अे दि. ११/११/२०१९

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात यते की, संदर्भांकित शासन निर्णयानुसार प्रकल्पाकरिता त्रयस्थ मनुष्यबळ पुरवठादार संस्थेची नियुक्ती करावयाची आहे. त्यानुसार विहीत प्रक्रिया अवलंबून प्रकल्पाकरिता T&M Services Consulting Private Limited, Mumbai यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर संस्थेसोबत आवश्यक तो करार दि. ३०/०८/२०२२ रोजी करण्यात आलेला असून तो योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

(ज्ञानेश्वर बा.बोटे)
अतिरिक्त प्रकल्प संचालक,स्मार्ट

D:\Subhash SMART Project 2022\Recruitment\T & M\Noting & Letter.docx 18

संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
मराठवाडा विभाग, औरंगाबाद
अरिहंत बिल्डींग, सिटी सर्व्हे नंबर २७१४, हुबळीकर लॉन समोरील गल्ली,
खडकेश्वर, औरंगाबाद
दूरध्वनी : (०२४०) २३३१०८५ ई मेल- directorinf.aurangabad@gmail.com
Dgipr Marathwada dgiprmarathwada.blogspot.in @DMarathwada

जा.क्र.संमाऔ/जाहिरात/दर-पत्रक/२०१९/११५
दिनांक 19 JAN 2019

संदर्भ: १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.पीयुबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दि.१ मे,२००१
२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/३४,दि.३१ ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.मावज-२०१८/प्र.क्र.३४८/३४, दिनांक २० डिसेंबर, २०१८

## दर प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **दैनिक महाराष्ट्र टाईम्स, औरंगाबाद** हे वृत्तपत्र शासनमान्य जाहिरात यादीत **मध्यम (ब वर्ग)** या संवर्गात समाविष्ट आहे. संदर्भांकित क्र.३ च्या शासन निर्णयातील नियम क्रं.४.५.२ मधील सुत्रानुसार या नियतकालिकाचा महासंचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या नोंदीनुसार **३६,१००** खपाच्या आधारे जाहिरातीचा दर प्रती चौ.से.मी. रु.४२/- (अक्षरी रुपये बेचाळीस फक्त) निश्चित करण्यात आला आहे.

कृष्णधवल जाहिरातीच्या मूळ दरावर ४० टक्के अधिक रंगीत दर देण्यात येत आहे. पहिल्या पानाकरिता, नाविन्यपूर्ण उपक्रमाकरिता (फ्रेंच विंडो, हाफ फ्लॅप, सोलो जाहिरात) ५० टक्के अधिक दर तसेच जॅकेट पेजसाठी १०० टक्के अधिक दर त्याचप्रमाणे विशिष्ट पानावर जाहिरातीचा मजकूर प्रसिध्द करण्यासाठी कार्यादेशात नमूद असल्यास २५ टक्के अधिक दर देण्यात येईल.

हा दर सर्व शासकीय विभाग, कार्यालये, महामंडळे, मंडळे, प्राधिकरणे, उपक्रम, आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर स्वायत्त संस्था, जिल्हा परिषद, नगर परिषद, शासन पुरस्कृत सहकारी संस्था इत्यादीच्या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातींना लागू राहतील.

उपरोक्त नमूद केलेली नियमावली आणि दर दि.१ जानेवारी,२०१९ पासून अंमलात आले आहेत.

( यशवंत भंडारे )
प्र. संचालक (माहिती)
औरंगाबाद

टीप : दि. १ जानेवारी, २०१९ पासून जाहिरातीच्या प्रत्येक देयकासोबत या आदेशाची प्रत जोडण्यात यावी.

प्रति,
संपादक / जाहिरात व्यवस्थापक,
दैनिक महाराष्ट्र टाईम्स, औरंगाबाद

Scanned with OKEN Scanner

12 minutes ago

दूरध्वनी क्र.२२८१८७१८

क्र.:मावज/जाहिरात/दर.प्रमा.२०२०.२१/का.५/ ४
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन,
१७ वा मजला, मंत्रालयासमोर,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०००३२
दिनांक : 24 AUG 2020

संदर्भ : १) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.पीपूबी-१०००/प्र.क्र.७३/2000/३४, दि.१ मे, २००१
२) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/३४, दि.३१ ऑगस्ट, २००९
३) शासन निर्णय, सा.प्र.वि. क्र.मावज-२०१८/प्र.क्र.३४८/३४, दि.२० डिसेंबर, २०१८
४) आदेश क्र.जाहिरात/अपपूप्र/२०१९-२०/२७२, दि.१३ ऑगस्ट, २०२०

# दर प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **दैनिक सकाळ** हे वृत्तपत्र शासनमान्य जाहिरात यादीत **मोठे** या संवर्गात समाविष्ट आहे. संदर्भाधिन क्र.३ च्या शासन निर्णयातील नियम क्र.४.५.२ मधील सूत्रानुसार आणि नियम क्र.४.५.५ व क्र.४.५.६ अन्वये अतिरिक्त दर देण्यात आला आहे. संदर्भ क्र.४ नुसार या नियतकालिकाच्या महासंचालनालयाकडे उपलब्ध असलेल्या नोंदीनुसार **१५४५७४** या खपाच्या आधारे दरवाढ करण्यात आली आहे. जाहिरातीचा दर प्रति चौ.से.मी. **रु.१०७/- (रुपये एकशे सात फक्त)** निश्चित करण्यात आला आहे.

कृष्णधवल जाहिरातीच्या मूळ दरावर ४०% अधिक रंगीत दर देण्यात येत आहे. पहिल्या पानाकरिता, नाविन्यपूर्ण उपक्रमाकरिता (फ्रेंच विंडो, हाफ फ्लॅप, सोलो जाहिरात) ५०% अधिक दर तसेच जॅकेट पेजसाठी १००% अधिक दर त्याचप्रमाणे विशिष्ट पानावर जाहिरातीचा मजकूर प्रसिद्ध करण्यासाठी कार्यादेशात नमूद असल्यास २५% अधिक दर देण्यात येईल.

हा दर सर्व शासकीय विभाग, कार्यालये, महामंडळे, मंडळे, प्राधीकरणे, उपक्रम, आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर स्वायत्त संस्था, जिल्हा परिषद, नगर परिषद, शासन पुरस्कृत सहकारी संस्था इत्यादींच्या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातींना लागू राहतील.

उपरोक्त नमूद केलेली नियमावली आणि दर दि.१३ ऑगस्ट, २०२० पासून अंमलात आले आहेत.

संचालक (माहिती)
(वृत्त व जनसंपर्क)

टिप : दि.१३ ऑगस्ट, २०२० पासून अंमलात येतील. जाहिरातीच्या प्रत्येक देयकासोबत या आदेशाची प्रत जोडण्यात यावी

प्रति,
संपादक / जाहिरात व्यवस्थापक,
दैनिक सकाळ, मराठी
औरंगाबाद